मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेत अधिकाऱ्यांच्या भेटीची वेळ बदलली

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा मोठा निर्णय; मंगळवार आणि गुरुवार दुपारी 4 ते 6 या वेळेतच घेता येणार भेट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील विविध कामांसंदर्भात अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी नागरिकांकरिता ठेवण्यात आलेल्या वेळेमध्ये प्रशासनाने बदल केला आहे. आता आठवड्यातील मंगळवार आणि गुरुवार हे दोन दिवस दुपारी चार ते सायंकाळी सहा या वेळेत अधिकाऱ्यांना भेटता येणार आहे. याबाबतचा आदेश सामान्य प्रशासन विभागाने काढला आहे.

पावणेचार वर्षांची प्रशासकीय राजवट संपून फेब्रुवारीपासून महापालिका सभागृह अस्तित्वात आले. प्रशासकीय राजवटीमध्ये तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी अधिकाऱ्यांना भेटण्याची वेळ सोमवार, बुधवार व शुक्रवार दुपारी तीन ते सायंकाळी सहा अशी निश्चित केली होती. आता महापालिकेत लोकप्रतिनिधी निवडून आल्यामुळे नागरिकांच्या समस्यांचे त्वरित निवारण व पारदर्शक प्रशासकीय कामकाज साध्य होत असल्याचा दावा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केला. त्यामुळे नागरिकांना अधिकाऱ्यांना विविध कामांसंदर्भात आठवड्यातील केवळ मंगळवार आणि गुरुवार या दोन दिवसांत दुपारी चार ते सायंकाळी सहा या वेळेत भेटता येणार आहे.

विभागप्रमुख, अधिकाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे पालन करावे. काटेकोर नियमितपणा व वक्तशीरपणा राखवा. वेळेत कार्यालयात उपस्थित राहावे. कार्यालयीन वेळेनंतरच कार्यालय सोडावे, असे पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.



### तीन दिवसांवरून दोन दिवस; वेळेतही कपात

» यापूर्वी नागरिकांना सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी दुपारी 3 ते सायंकाळी 6 या वेळेत अधिकाऱ्यांना भेटता येत होते. नव्या आदेशानुसार आता ही वेळ मंगळवार आणि गुरुवार, दुपारी 4 ते सायंकाळी 6 अशी करण्यात आली आहे. म्हणजेच आठवड्यातील एक दिवस आणि दररोजचा एक तास कमी करण्यात आला आहे. प्रशासनाचा दावा आहे की, महापालिकेत लोकप्रतिनिधी परत आल्यामुळे नागरिकांच्या समस्या जलदगतीने सोडवल्या जात आहेत. त्यामुळे कामकाज अधिक पारदर्शक आणि सुरळीत करण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे.

### भेटीबाबत आयुक्तांच्या अधिकाऱ्यांना सूचना

- » भेटीच्या वेळेत विभागांतर्गत बैठकांचे, दौऱ्याचे आयोजन करू नयेत.
- » भेटीचा कालावधी सूचना फलकावर ठळकपणे लावावा.
- » प्रत्येक अभ्यागताचे म्हणणे पुरेसा वेळ देऊन ऐकून घ्यावे.
- » अभिप्राय प्रणाली तयार करून नागरिकांच्या समस्यांचे निराकरण झाले की नाही, याची खात्री करावी.
- » अपरिहार्य कारणांमुळे विभागप्रमुखांना कार्यालयात उपस्थित रहाणे शक्य नसल्यास पर्यायी व्यवस्था करावी.

---

# पिंपरीत PNG गॅस पाईपलाईन फुटली; मोठा आवाज, नागरिकांमध्ये भीती

## पिंपरी-चिंचवडमधील मोहननगर येथे MNGL गॅस पाईपलाईन फुटल्याने स्फोटासारखा आवाज, एक जखमी, सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोहननगर परिसरात दुपारी एमएनजीएल कंपनीची पीएनजी गॅस पाईपलाईन फुटल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात स्फोटासारखा मोठा आवाज झाला असून काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, मोठा आवाज झाल्यानंतर काही क्षण काय घडले हेच समजले नाही. सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर आणि गणेश लंगोटे यांनीही या घटनेविषयी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.



शहरातील मोहननगर परिसरात मंगळवारी दुपारी एमएनजीएल कंपनीची पीएनजी गॅस पाईपलाईन फुटल्याची घटना घडली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे स्फोटासारखा मोठा आवाज झाला आणि परिसरात काहीकाळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. जीव वाचवण्यासाठी नागरिकांनी धावाधाव करत सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला.

दुपारी सुमारे एकच्या सुमारास ही घटना घडली असून संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. पाईपलाईन फुटल्यानंतर मोठ्या प्रमाणात दगड-माती हवेत उडाली. याचवेळी रस्त्यावरून दुचाकीवरून जात असलेल्या एका व्यक्तीच्या अंगावर दगड लागल्याने तो जखमी झाला. सुदैवाने जखम किरकोळ असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

ही पाईपलाईन एमएनजीएलची असून त्यातून पीएनजी गॅस पुरवठा केला जातो, असे नागरिकांचे म्हणणे आहे. पाईपलाईन टाकण्याच्या कामात हलगर्जीपणा झाल्याचा आरोपही स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

या घटनेमुळे परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा प्रकारच्या दुर्घटनांना जबाबदार कोण, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी घटनेचे भयावह स्वरूप सांगत मोठा आवाज झाल्यानंतर काही क्षण काय घडले हेच समजले नाही, असे प्रत्यक्षदर्शी यांनी सांगितले. स्थानिक नागरिक मारुती भापकर, गणेश लंगोटे यांनीही या घटनेविषयी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आरोग्यसेवेचा दर्जा उंचावला

## मल्टिस्पेशालिटी रुग्णालयांमुळे मोठा दिलासा; लाखो नागरिकांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार सेवा उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगनगरी पिंपरी चिंचवड शहरातील वाढणाऱ्या लोकसंख्येची गरज लक्षात घेता आरोग्य सुविधांमध्ये मोठे बदल घडत आहेत. काही वर्षांपूर्वी सर्वसामान्य व कामगारवर्गाला आपल्या उपचारांसाठी केवळ यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयावर (वायसीएम) अवलंबून राहावे लागत होते. मात्र, सध्या महापालिकेच्या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयांमुळे उत्तम आरोग्य सुविधा मिळत आहे.

शहरातील सर्वांत जुने व मोठे रुग्णालय 'वायसीएम'ची ओळखही रुग्णालयापुरती मर्यादित न राहता नर्सिंग महाविद्यालय, वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण संस्था अशी झाली आहे. दवाखान्यांपासून ते मल्टिस्पेशालिटी रुग्णालयांपर्यंत उपचार साखळी महापालिकेने उभारली आहे. ज्यामध्ये नेत्र रुग्णालय, माता व बालक सेवा रुग्णालये यांचा समावेश आहे.

त्यामुळे नागरिकांना अगदी कमीत कमी खर्चात उत्तम आरोग्य सुविधा मिळत आहेत. दुसरीकडे जळीत कक्ष व कर्करोग उपचार रुग्णालयेही प्रास्तावित आहेत. महापालिकेच्या बाह्यरुग्ण विभागात २०२४-२५ मध्ये ३९ लाख ५३ हजार, तर आंतररुग्ण विभागातून या वर्षात ३ लाख २० हजार जणांनी उपचार घेतले आहेत.




### प्रस्तावित सुविधा आणि क्षमता (खाटा)

- जुन्या तालेरा रुग्णालयात जळीत कक्ष उभारणी सुरू : ३०
- थेरगाव येथे कर्करोग रुग्णालयाच्या कार्यारंभ आदेश : १००
- मोशी रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर : ७००
- एकूण दवाखाने : ३६
- झोपडपट्टी आरोग्य सेवा केंद्र : ३१
- लसीकरण केंद्र : एक हजार ३१

> रुग्णांना उत्तम सेवा देण्याच्या दृष्टीने आम्ही काम करत आहोत. आरोग्याच्या समस्या उद्भवूच नयेत, यासाठी शहरात ७९ आरोग्यवर्धिनी केंद्रांची उभारणी करत आहोत. त्यातील ६४ केंद्रांचे काम पूर्ण झाले आहे. येथे नवजात शिशू ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत १३ विविध आरोग्य सेवांचे संच आम्ही केलेले आहेत. त्याद्वारे प्रभावी सेवा देत आहोत.
>
> - डॉ. अभय दादेवार, अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी, वायसीएम रुग्णालय

### रुग्णालय क्षमता (खाटा)

- प्रसूतिगृहे क्षमता (खाटा)
- सांगवी रुग्णालय : २०
- यमुनानगर रुग्णालय : ३०
- नेत्र रुग्णालय क्षमता (खाटा)
- शंकरराव मासुळकर
- नेत्र रुग्णालय : ४८

# पिंपळे सौंदागरमध्ये सायकल शेअरिंग प्रकल्प सुरू; स्मार्ट सिटी उपक्रमाला गती

## पर्यावरणपूरक वाहतुकीचा नवा पर्याय; नागरिकांना किफायतशीर प्रवासाची सुविधा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. स्टार्ट-अप संस्था प्री-वाई (PRE-VAI) यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या पिंपळे सौंदागर येथील लिनिअर गार्डन येथील सार्वजनिक सायकल शेअरिंग प्रकल्पाचे उद्घाटन नगरसदस्य शत्रुघ्न उर्फ बापू काटे आणि विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या हस्ते करण्यात आले.



या कार्यक्रमाला नगरसदस्या कुंदा भिसे, अनिता काटे, संदीप काटे, उमेश काटे यांच्यासह प्रभारी शहर अभियंता मनोज सेठिया, सह शहर अभियंता बापू गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनिल पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक सायकल शेअरिंग प्रकल्प उभारण्यात आला आहे. असा प्रकल्प उभारण्यासाठी जगभरातील ६६ देशांमधून ८ शहरांची निवड करण्यात आली आहे. त्यात पिंपरी चिंचवड शहराचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

या प्रकल्पाची स्थापना निखिल देशमुख आणि प्रत्युष श्रीनिवासन यांनी केली आहे. नागरिकांना अल्प अंतरासाठी किफायतशीर, सोयीस्कर आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे, हा राइडशेअर प्रकल्प युरोपियन मानकांनुसार डिझाइन करण्यात आला असून, विशेषतः आयईसी 62196-4 (डीसी चार्जिंग प्रोटोकॉल) या आंतरराष्ट्रीय मानकांचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच, हा प्रकल्प आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्था अंतर्गत या उपक्रमाअंतर्गत समाविष्ट असून, त्याद्वारे प्रकल्पाचे मॉनिटरिंग आणि मार्गदर्शन केले जात आहे. जर्मनीतील जागतिक तज्ज्ञांकडून या स्टार्टअपला मार्गदर्शन मिळत असून, त्यांच्याकडून सातत्याने देखरेखही ठेवली जात आहे.

या उपक्रमासाठी कनिष्ठ अभियंता अमोल पांचगणे, गिरीश गुठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### रुग्णालय क्षमता (खाटा)

- ६६ देशांतील २७५ अर्जांमधून निवडलेला एक जागतिक स्तरावर गौरवलेला उपक्रम
- ही संकल्पना केवळ वाहतुकीपुरती मर्यादित नसून, ती स्वच्छ, शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक शहर घडवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे
- भविष्यातील स्मार्ट मोबिलिटीची नवी ओळख निर्माण करणारा हा प्रकल्प असून, शहराला स्मार्ट, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित वाहतूक व्यवस्था देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.
- डॉक-टू-डॉक राइडशेअर प्रणाली
- जिओ-फेन्सिंग तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षित ऑपरेशन
- अत्याधुनिक IoT (Internet of Things) तंत्रज्ञानाचा वापर
- केंद्रीकृत कमांड आणि कंट्रोल प्रणाली
- उच्च दर्जाच्या स्मार्ट बायसिकल्स आणि ई-बायसिकल्सची उपलब्धता
- डॉक-आधारित चार्जिंग सुविधा

# सर्वेक्षणानंतरच आता होणार रस्तेखोदाई

## 'ग्राउंड पेनिट्रेटिंग रडार' या अत्याधुनिक तंत्रज्ञानचा वापर करून सर्वेक्षण केल्यानंतरच रस्त्यांची खोदाईचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

रस्ते विकास, देखभाल दुरुस्तीची कामे करताना रस्त्याखालील सेवा वाहिन्यांचे 'ग्राउंड पेनिट्रेटिंग रडार' या अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या उपकरणांचा वापर करून सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यानंतरच ठेकेदारांना काम सुरू करता येणार आहे. त्यामुळे रस्त्यांची खोदाई करताना सेवा वाहिन्यांचे नुकसान आणि संभाव्य अपघातही टाळण्यास मदत होणार असल्याचा दावा महापालिकेच्या पथ विभागाच्यावतीने करण्यात आला आहे.

शहरातील रस्त्यांखालून पाणीपुरवठा, ड्रेनेज, पावसाळी गटारे, 'एमएनजीएल'च्या गॅस वाहिन्या, महावितरणच्या वीज वाहिन्या, विविध कंपन्यांच्या केबल्सचे जाळे पसरले आहे. रस्त्यांचा विकास अथवा देखभाल दुरुस्तीची कामे करताना अनेकदा जलवाहिनी फुटणे, वीजवाहिन्या तुटण्याच्या घटना घडतात. यामुळे सेवा खंडित होऊन काही वेळा दुर्घटना घडण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने 'ग्राउंड पेनिट्रेटिंग रडार' या अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या उपकरणांचा वापर करून सर्वेक्षण केल्यानंतरच रस्त्यांची खोदाई करण्याचा निर्णय घेतला आहे. हे सर्वेक्षण करून घेणे ठेकेदारांना बंधनकारक करण्यात आले आहे.

पुणे महानगरपालिकेने रस्ते विकास आणि दुरुस्तीच्या कामांमध्ये 'ग्राउंड पेनिट्रेटिंग रडार' (GPR) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने रस्त्याखालील विविध सेवा वाहिन्यांचे अचूक स्थान शोधता येणार असून, त्यानंतरच ठेकेदारांना काम सुरू करता येणार आहे.

महापालिकेकडे सेवा वाहिन्यांचे एकत्रित नकाशे उपलब्ध नाहीत. त्यामुळे रस्त्यांचे काम करत असताना अंदाजे खोदाई करण्यात येते. त्यामुळे सेवा वाहिन्या खंडित होऊन त्याचा परिणाम सेवांवर होतो. त्यामुळे पालिकेच्या पथ विभागाने रस्ते खोदाई करण्यापूर्वी 'ग्राउंड पेनिट्रेटिंग रडार'चा वापर करून सर्वेक्षणाचा निर्णय घेतला आहे. रस्ते खोदाईची परवानगी मागितली गेल्यानंतर ठेकेदारांना आता सर्वेक्षण करून घ्यावे लागणार आहे. दरम्यान, सर्वेक्षणाच्या खर्चाचा अंतर्भाव हा कामाच्या पूर्वगणनपत्रामध्येच करण्याचे आदेश पथ विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश बनकर यांनी सर्व विभागप्रमुखांना दिले आहेत.




### ठेकेदारांसाठी सर्वेक्षण बंधनकारक

**» रस्ते खोदाईसाठी परवानगी घेताना ठेकेदारांना आता GPR सर्वेक्षण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या सर्वेक्षणाचा खर्चही कामाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्याचे आदेश देण्यात आले असून, यामुळे कामे अधिक सुरक्षित आणि नियोजनबद्ध होण्यास मदत होणार आहे.**

### अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

**» पुणे महानगरपालिकेने रस्ते विकास आणि दुरुस्तीच्या कामांमध्ये 'ग्राउंड पेनिट्रेटिंग रडार' (GPR) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने रस्त्याखालील विविध सेवा वाहिन्यांचे अचूक स्थान शोधता येणार असून, त्यानंतरच ठेकेदारांना काम सुरू करता येणार आहे.**

### सेवा खंडित होण्याचा धोका कमी

**» शहरातील रस्त्यांखाली पाणी, ड्रेनेज, गॅस, वीज आणि केबल्सचे जाळे असल्याने खोदाईदरम्यान अनेकदा नुकसान होते. त्यामुळे सेवा खंडित होऊन नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. GPR सर्वेक्षणामुळे या समस्या टाळता येऊन अपघातांची शक्यता देखील कमी होणार आहे.**

# रक्षक चौकातील उड्डाणपुलाचे होणार सेफ्टी ऑडिट

## इंडियन रोड काँग्रेसच्या मार्गदर्शकानूसार होणार दुरुस्ती, काम अंतिम टप्प्यात असतानाच सुरक्षा तपासणीचा निर्णय...

**पुणे | प्रतिनिधी**

औंध-रावेत बीआरटी रोडवरील रक्षक चौकात उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. उड्डाणपूल उभारताना कंत्राटदाराने उताराच्या तांत्रिक बाबीकडे पुरेसे लक्ष दिले नाही. तीव्र उतारामुळे भविष्यात अपघात होण्याची शक्यता लक्षात घेवून महापालिकेकडून उड्डाणपुलाच्या सुरक्षा तपासणीचे आदेश देण्यात आले आहेत. इंडियन रोड कॉंग्रेसच्या मार्गदर्शकानुसार तपासणी अहवाल आल्यानंतर दुरुस्ती केली जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून रक्षक चौकातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बीआरटीएस रस्त्यावर हा उड्डाणपूल बांधला जात आहे. महापालिकेने २२.७७ कोटी रुपयांचा हा प्रकल्प ठेकेदार मे.टी अ‍ॅन्ड टी इन्फा लिमिटेड दिला असून, में इन्फाकिंग कन्सल्टिंग इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. सुमारे ७५ टक्के रक्कम अदा केली असून, प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.

दरम्यान, महापालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागाकडून रक्षक चौकात उड्डाणपूलाचे सेफ्टी ऑडीट करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत स्थापत्य विभागाच्या कार्यकारी अभियंता संध्या वाघ म्हणाल्या की, उड्डाणपुलाच्या सुरक्षा तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा अहवाल पुढील काही दिवसांत अपेक्षित आहे. तपासणीतील निष्कर्षांच्या आधारे सुधारणात्मक उपाययोजना करण्यास तयार आहे.

उड्डाणपुलाची कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणेकडून तपासणी करुन इंडियन रोड्स काँग्रेसच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार याची अंमलबजावणी केली जाणार आहे. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून सुरक्षा तपासणीचे (सेफ्टी ऑडिट) आदेश देण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उडडाणपूलाचे बांधकाम सध्या सुरूच राहील आणि लेखापरीक्षण अहवालाचे पुनरावलोकन केल्यानंतर आवश्यक ते बदल लागू केले जातील.



### तीव्र उतारामुळे भविष्यात अपघातांचा धोका

**» खासदार श्रीरंग बारणे यांनी रक्षक चौकातील उड्डाणपुलाच्या जागेची पाहणी केल्यानंतर पुलाच्या उताराचा मुद्दा समोर आला. पुलाचा उतार जास्त तीव्र असल्याने भविष्यात अपघात होण्याची शक्यता असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. निगडी येथील मधुकर पवळे उड्डाणपुलावरही अशाच तीव्र उतारामुळे वारंवार अपघात होत असल्याचा दाखला देत त्यांनी प्रशासनाला सावध केले. रक्षक चौक हा वर्दळीचा मार्ग असल्याने हा उड्डाणपूल नागरिकांसाठी खुला करण्यापूर्वी त्याच्या रचनेत आवश्यक सुधारणा करून सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी अधिकाऱ्यांकडे केली. तसेच निष्काळजीपणामुळे अपघात घडल्यास संबंधित अधिकारी आणि सल्लागारांवर सदोष मनुष्यवधासह कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.**

# कैलास सत्यार्थी यांना 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार 2026' जाहीर

## पुण्यात 24 एप्रिलला भव्य सांस्कृतिक सोहळा; विविध क्षेत्रातील दिग्गजांचा सन्मान

**पुणे | प्रतिनिधी**

नोबेल शांतता पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांना यंदाचा मानाचा 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार 2026' जाहीर झाला आहे. पद्मश्री पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी ही घोषणा केली असून मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८४ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून हा सोहळा पार पडणार आहे.

मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान आणि हृदयेश आर्ट्स तर्फे सकाळ माध्यम समूहाच्या सहकार्याने आयोजित केला जाणारा हा कार्यक्रम देशातील एक अत्यंत प्रतिष्ठित सांस्कृतिक उपक्रम मानला जातो. कला, साहित्य आणि समाजसेवा या क्षेत्रांत अष्टपैलू योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना सन्मानित करण्याची परंपरा या निमित्ताने यंदाही जपली जाणार आहे.



### सांस्कृतिक मेजवानी आणि मान्यवर उपस्थिती

» कार्यक्रमात पं. हृदयनाथ मंगेशकर यांची 'मी लता दीनानाथ...' ही विशेष सांगीतिक मैफल सादर होणार आहे. विविध गायक-गायिका या मैफलीत सहभागी होणार आहेत. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, हा भव्य सोहळा २४ एप्रिल २०२६ रोजी गणेश कला क्रीडा मंदिर, पुणे येथे पार पडणार आहे.

### मानाचा पुरस्कार जाहीर

» पुण्यात होणाऱ्या प्रतिष्ठित 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार 2026' साठी नोबेल शांतता पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. पद्मश्री पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी ही घोषणा केली. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८४ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून हा सोहळा आयोजित करण्यात आला असून, देशातील कला, साहित्य आणि समाजसेवा क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे.

### विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

» या वर्षी संगीतासाठी महेश काळे, नृत्यासाठी शमा भाटे, रंगभूमी व चित्रपटासाठी सुबोध भावे, तर सिनेमा क्षेत्रासाठी रवीना टंडन आणि प्राजक्ता माळी यांना सन्मानित करण्यात येणार आहे. पत्रकारितेसाठी सुशील कुलकर्णी, साहित्यासाठी अच्युत गोडबोले आणि विशेष पुरस्कारासाठी डॉ. धनंजय केळकर यांची निवड झाली आहे.

या वर्षीच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये विविध क्षेत्रांतील नामवंतांचा समावेश आहे. संगीत क्षेत्रातील योगदानासाठी महेश काळे आणि नृत्य क्षेत्रासाठी शमा भाटे यांना गौरवण्यात येणार आहे. रंगमंच आणि चित्रपट विभागातून सुबोध भावे यांना, तर सिनेमा क्षेत्रासाठी रवीना टंडन आणि प्राजक्ता माळी यांना हा सन्मान प्रदान केला जाईल.

पत्रकारितेतील योगदानासाठी सुशील कुलकर्णी, साहित्यासाठी अच्युत गोडबोले आणि विशेष पुरस्कारासाठी डॉ. धनंजय केळकर यांची निवड करण्यात आली आहे. समाजसेवेच्या गटात ठाण्यातील वसुंधरा संजीवनी मंडळाचे आनंद भागवत यांचा सत्कार होईल. तसेच 'मोहन वाघ पुरस्कार' यंदा जिगीषा अष्टविनायक निर्मित 'भूमिका' या नाटकाला देण्यात येणार असून, मुख्य अभिनेता सचिन खेडेकर यांच्यासह निर्माते दिलीप जाधव आणि श्रीपाद पद्माकर यांनाही सन्मानित केले जाईल.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराचे' हे पाचवे वर्ष आहे. कैलास सत्यार्थी यांनी मुलांच्या अधिकारांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी केलेल्या अतुलनीय कार्याचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून केला जाणार आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड हे या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विज्ञान, अध्यात्म आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा प्रसार करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्या उपस्थितीला विशेष महत्त्व आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी म्हणून पं. हृदयनाथ मंगेशकर स्वतः 'मी लता दीनानाथ...' ही विशेष सांगीतिक मैफल सादर करणार आहेत. यामध्ये लता मंगेशकर यांच्या अजरामर गीतांचा प्रवास उलगडला जाईल. या मैफलीत विभावरी जोशी, मधुरा दातार, सावनी रविंद्र, श्रेयसी पावगी, मनीषा निश्चल, ऋतुजा तारे आणि डॉ. उन्मेष करमरकर हे कलाकार गायन सादर करतील. मिलिंद कुलकर्णी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतील, तर सुप्रिया चिटणीस सुत्रसंचालक म्हणून जबाबदारी सांभाळतील. हा भव्य सोहळा शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५:०० ते रात्री १०:०० या वेळेत गणेश कला क्रीडा मंदिर, स्वारगेट, पुणे येथे संपन्न होणार आहे.

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर 31 मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय

## नवीन सभामंडप व सुविधा उभारणीसाठी निर्णय; भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य

**पुणे | प्रतिनिधी**

नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर परिसरात विकासकामे सुरू आहेत. जून महिन्यात पावसाला सुरुवात होण्यापूर्वी ही कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी मंदिर गुरुवारपासून (९ एप्रिल) ३१ मे २०२६ पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी ही माहिती दिली.

नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे गर्दी होणार असल्याने या ठिकाणी सुविधा उपलब्ध होण्यासाठी २८८.१७ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार कामे हाती घेण्यात आली आहेत. ही कामे पूर्ण करण्यासाठी ३१ मेपर्यंत मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले.



### विकासकामांसाठी मंदिर बंद

» नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. ही कामे वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी ९ एप्रिल ते ३१ मे २०२६ दरम्यान मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. सध्या मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर बांधकाम साहित्य व यंत्रसामग्री असल्याने दर्शनासाठी मंदिर खुले ठेवणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तात्पुरते मंदिर बंद ठेवण्यात आले आहे.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता सुमारे २८८.१७ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यात नवीन भव्य सभामंडप, पायरी मार्ग आणि इतर सुविधा उभारण्याची कामे सुरू आहेत. कुंभमेळ्यावेळी श्री क्षेत्र भीमाशंकर येथे होणाऱ्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता जुन्या सभामंडपाचे क्षेत्र कमी पडणार असल्याने नवीन भव्य सभामंडपाचे काम हाती घेण्यात आले आहे.

पायरी मार्गाचे कामदेखील सुरू आहे. सद्य:स्थितीत मुख्य सभामंडप पूर्ण उतरवून नवीन सभामंडपाचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. सभामंडप बांधकामासाठी लागणारे बांधकाम साहित्य, मोठ्या आकाराचे दगड आणि अन्य यंत्रसामग्री मंदिर परिसरात आहे. बांधकाम सुरू असताना मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे धोकादायक असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.